# मुंबई विद्यापीठ



कमांक/संलग्नता/आयसीसी/२०१४-१५/ 23

## परिपत्रक:

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / संस्थांचे, प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, त्याचे महाविद्यालय / संस्थेबाबत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभाग / कक्ष यांचेकडे प्रलंबित असलेल्या बाबी / प्रस्ताव / प्रकरणे यांचा आढावा घेऊन प्रशासकीय मान्यतेने तातडीने निकाली / निपटारा करण्याकरिता कॅम्प आयोजित करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

तरी यासंदर्भात माननिय कुलगुरूंच्या आदेशानुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांचे / संस्थांचे, प्राचार्य/संचालक यांना विनंती करण्यात येते की, विद्यापीठाचे विविध प्रशासकिय विभाग (घटक महाविद्यालये कक्ष, संलग्नता विभाग, पदविपुर्व/ पदव्युत्तर विभाग, विशेष कक्ष, विद्याविषयक प्राधिकरणे विभाग, विद्याविषयक नियोजन आणि विकास कक्ष) यांचेशी संबंधीत असलेल्या प्रलंबीत बाबी/ प्रस्ताव / प्रकरणे बाबतची सविस्तर माहिती स्थळप्रत/ इतर सर्व कागदपत्रांसहित तातडीने दहा दिवसाच्या आत कुलसचिव कार्यालयात सादर करावीत. त्या अनुषंगाने आयोजित करण्यात येणा-या कॅम्प मध्ये सर्व प्रलंबीत बाबींचा आढावा घेऊन निकाली काढणे सोईचे होईल.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेसह!

मुंबई-४०० ०३२
२ मार्च, २०१५

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

प्रति

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / संस्थांचे प्राचार्य / संचालक

प्रत माहितीकरिता व योग्य त्या कार्यवाहीकरिता :-

१. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये कक्ष
२. उपकुलसचिव, संलग्नता विभाग
३. उपकुलसचिव, पदविपुर्व/पदव्युत्तर विभाग
४. उपकुलसचिव, विशेष कक्ष
५. उपकुलसचिव, विद्याविषयक प्राधिकरणे
६. सहाय्यक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास
७. कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक
८. संचालक (म.वि.वि.मं) यांचे स्वीय सहाय्यक
९. कुलसिचवांचे स्वीय सहाय्यक